# थायलंड येथील शैक्षणिक भेटीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली भारतातील सीबीएसई स्कूलचे प्रिन्सिपल यांची बँकॉक थायलंड येथील डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशनला शैक्षणिक भेट दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले आहे.

प्रिन्सिपल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली सी.बी.एस.ईचे प्रिन्सिपल डॉ. निकिता कोठारी (इंडॉस्कॉट ग्लोबल स्कूल ठाणे), डॉ. दिपाली शिरगावे (विश्व कल्याण इंग्लिश मीडियम स्कूल, चिखली, पुणे) व डॉ. अश्विनी पानसरे (अभिनव पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, पुणे) यांची २८ मे २०२४ रोजी शैक्षणिक भेटीसाठी थायलंड येथील डॉक्टर कांचली पुनियन वरिष्ठ शिक्षक डायरेक्टर कार्यालय, शिक्षण मंत्रालय, थायलंड यांनी निवड केली.

एक्सलन्स इन सायन्स एज्युकेशन ब्यूरो ऑफिस ऑफ बेसिक एज्युकेशन कमिशन मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन थायलंड इथे डॉक्टर कांचली पुनियन व त्यांचे सहकारी यांच्यासोबत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने STEM एज्युकेशन आणि फ्युचर वर्क फोर्स याबाबत नवीन अभ्यास उपक्रम व त्याबाबत थायलंड येथील दिले जाणारे शिक्षण इन्स्पायरिंग सायन्स इन क्लासरूम ह्या प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पीपीटीच्या प्रेझेंटेशनद्वारे थायलंड एज्युकेशन सिस्टम समजून सांगण्यात आले. बँकॉक थायलंड ह्या भेटी अंतर्गत थायलंड व भारत देशातील मुलांचे शैक्षणिक व विकासात्मक बदल घडून आणण्यासाठी, एकमेकांशी संवाद व सहकार साधण्यास मदत होणार आहे.

या सर्व शैक्षणिक भेटीचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी यांचे बँकॉक थायलंड शैक्षणिक भेटीबाबत कौतुक करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजंच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे आदी उपस्थित होते.

